# मतदान केलेल्या बोटाची शाई दाखवा व मोफत नेत्रतपासणी करा - रुग्ण सेवा मंडळाचा अभिनव उपक्रम




प्रतिनिधी - प्रतिमा शिंदे .

देगलूर - नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचे प्रमाण वाढावे आणि यावेळी नांदेड लोकसभा मतदार संघात 75 टक्केपेक्षा जास्त मतदान व्हावे या उद्देशाने जिल्हाधिकारी श्री अभिजीत राऊत आणि उपजिल्हाधिकारी श्री सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर तालुका स्वीप कक्षाच्यावतीने विविध अभिनव उपक्रम राबवले जात आहे. देगलूर शहरात मागील 46 वर्षापासून रुग्ण सेवा मंडळ जेष्ट -हृदयरोग तज्ञ डॉ. व्यंकटेश काब्दे यांच्या मार्गदर्शनाखाली समाज सेवेचे पवित्र कार्य निःस्वार्थपने करीत आहे. या संस्थेद्वारे सिमावर्ती भागातील गोरगरीब रुग्णाना नाममात्र दरामध्ये नेत्र तपासनी, मोतीबिंदु शस्त्रक्रिया, अम्बूलंस सेवा व इतर आरोग्य सेवा नियमित दिली जाते. रुग्णसेवा मंडळाच्या वतीने मतदान जनजागृती साठी प्रोत्साहन म्हणून दि. 26 एप्रिल 2024 रोजी जास्तीत जास्त लोकानी मतदान करावे आणि मतदान केलेल्या बोटाची शाई रुग्णसेवा मंडळामध्ये दाखवून पूर्णतः मोफत नेत्र तपासणी व उपचार करून घ्यावेत असे आवाहन स्वीप कक्ष, तहसील कार्यालय देगलूर आणि रुग्णसेवा मंडळ देगलूर यांच्या संयुक्तपणे करण्यात आलेले आहे. यासंदर्भात आज झालेल्या मतदार जनजागृती कार्यक्रमांमध्ये रुग्ण सेवा मंडळाचे उपाध्यक्ष श्री सूर्यकांत नारलावार, सहसचिव तथा तहसील कार्यालयातील स्वीप कक्षप्रमुख प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार, कोषाध्यक्ष प्रा. व्ही जी चिंतावार संस्थेचे कार्यकारी सदस्य देवेंद्र बालाजी मोतेवार सुभाष सांगवीकर, रमेश नारलावार, तसेच देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ. संतोष येरावार डॉ. नीरज उपलंचवार, शिवप्रसाद स्वामी, बालाजी सुगावकर धनाजी दौलते, डॉ. लक्ष्मण सुदाम, सुभाष वडगावे, कल्याण सदानंदे, यांच्यास रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते. यावेळी उपस्थित असलेल्या सर्व रुग्ण, रुग्णाचे नातेवाईक आणि विश्वस्तांना मतदानाचे पावित्र्य राखण्याची शपथ देण्यात आली.

Scanned with OKEN Scanner